# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)*

व्यवस्थापन परिषद दि. २६ ऑगस्ट, २०२३

७८ प्रव-अ-३२१/२६०८२३ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध संघातील विद्यार्थ्यांना सराव शिबीर आणि प्रत्यक्ष स्पर्धेच्या ठिकाणी देण्यात येणाऱ्या दैनंदिन भत्त्याबाबत.

(क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ)

संदर्भ: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या दि. २३ ऑगस्ट, २०२३ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.

(टीप: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध संघातील खेळाडूंचे सराव शिबीर आणि प्रत्यक्ष स्पर्धेच्या ठिकाणी देण्यात यावयाच्या दैनंदिन भत्त्यात एकसूत्रता येण्यासाठी मा. व्यवस्थापन परिषदेपुढे प्रस्ताव सादर.

१. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा मंडळातर्फे क्रीडा महोत्सव आंतर राज्य विद्यापीठ स्पर्धा, पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धा, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विद्यार्थी सहभागी होत असतात.

२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा मंडळाच्यावतीने पश्चिम विद्यापीठ व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या विविध संघातील विद्यार्थ्यांना सरावा दरम्यान (परगावच्या विद्यार्थ्यांना रु.२००/— प्रतिदिन व स्थानिक विद्यार्थ्यास रु. १५०/—) दैनंदिन भत्ता देण्यात येत आहे आणि अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये स्पर्धा कालावधीत रु.२५०/— प्रतिदिन दैनंदिन भत्ता देण्यात येतो. तसेच संघव्यवस्थापक, सहसंघव्यवस्थापक, मार्गदर्शक, केअरटेकर यांना प्रतिदिन रु.३००/— देण्यात येतात.

३. शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ पासून पश्चिम विभागीय व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना खालीलप्रमाणे प्रतिदिन प्रवासखर्चासह दैनंदिन भत्ता देण्यात यावा, असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| क्र. | तपशील | सध्याचा दर | | नवीन प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | सराव शिबीरादरम्यान | स्पर्धे दरम्यान | सराव शिबीरादरम्यान | स्पर्धे दरम्यान |
| १ | स्थानिक खेळाडू | रु. १५०/— | रु.२५०/— | रु.३००/— | रु.६००/— |
| २ | परगावचे खेळाडू | रु. २००/— | रु.२५०/— | रु.३००/— | रु.६००/— |
| ३ | संघव्यवस्थापक, मार्गदर्शक, इ. | विद्यापीठ नियमानुसार | रु.३००/— | विद्यापीठ नियमानुसार | रु.६००/— |

सोबत: १) मा. व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र. म ९८/०६०४१६ दि. ०६ एप्रिल, २०१६.
२) क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या दि. २३/०८/२३ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.

**सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व निर्णयार्थ सादर.**

**म : ३३७/२६०८२३**

**असा ठराव करण्यात येतो की, शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व संघव्यवस्थापक, सहसंघव्यवस्थापक, मार्गदर्शक, केअरटेकर यांना खालीलप्रमाणे दैनंदिन भत्ता देण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

| क्र. | तपशील | सध्याचा दर | | नवीन प्रस्तावीत दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | सराव शिबीरादरम्यान | स्पर्धे दरम्यान | सराव शिबीरादरम्यान | स्पर्धे दरम्यान |
| १ | स्थानिक खेळाडू | रु. १५०/- | रु. २५०/- | रु. ३००/- | रु. ६००/- |
| २ | परगावचे खेळाडू | रु. २००/- | रु. २५०/- | रु. ३००/- | रु. ६००/- |
| ३ | संघव्यवस्थापक, मार्गदर्शक इ. | विद्यापीठ नियमानुसार | रु. ३००/- | विद्यापीठ नियमानुसार | रु. ६००/- |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
सभा व दप्तर विभाग

सहाय्यक कुलसचिव
सभा व दप्तर
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे - ४११ ००७.